# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.02.2026** **वारः बुधवार**

---

• भारताला आरोग्यसेवा केंद्र बनवण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन

• पंतप्रधान आजपासून दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्यावर

• केरळचं केरलम असं नामांतर करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता, गोंदिया-जबलपूर रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासह ३ रेल्वे प्रकल्पांनाही मंजुरी

• संयुक्त राष्ट्रसंघात रशिया -युक्रेन युद्धविरामासंबंधीच्या ठरावावर झालेल्या मतदानात भारत तटस्थ आणि

• टी 20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, सुपर एट गटात इंग्लंडचा पाकिस्तानवर 2 गडी राखून विजय

**<u>राष्ट्रपती</u>**

भारताला आरोग्यसेवा केंद्र बनवण्याचं आणि विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी खाजगी क्षेत्र, सामाजिक संस्था, विचारवंत आणि अन्य संबंधितांनी एकत्र यावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. जीव रक्षण आणि आरोग्यसंपन्न भारताची निर्मिती या देशव्यापी मोहीमेचा प्रारंभ काल मुंबईत राष्ट्रपतींच्या हस्ते झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. आरोग्याचं महत्त्व सांगतानाच केंद्र सरकारच्या आरोग्यसेवाविषयक विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. बदलत्या काळात मानसिक अस्वस्थतेचा शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे असं सांगून राष्ट्रपतींनी मानसिक आरोग्याचं महत्त्व विशद केलं. या कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसंच अन्य मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी राष्ट्रपतींचं दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यासाठी काल मुंबईत आगमन झालं. आज राष्ट्रपती शेगाव इथं राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचं उद्‌घाटन करणार आहेत. आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाच्यावतीनं या मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. चार दिवसांच्या या मेळाव्यात नागरिकांना आयुर्वेद, योग आणि इतर पारंपरिक आरोग्यसेवा शाखांसह विविध आयुष प्रणालीं मार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्‌यकीय सल्ला आणि औषधं घेण्याची संधी मिळेल.

पंप्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दोन दिवसांच्या अधिकृत इस्रायल दौऱ्यावर रवाना होणार आहेत. पंतप्रधानांचा हा दुसरा इस्रायल दौरा आहे. या भेटीत पंतप्रधान मोदी आणि त्यांचे इस्रायलचे समपदस्थ बेंजामीन नेतान्याहू भारत- इस्रायल धोरणात्मक भागीदारीत झालेल्या उल्लेखनीय प्रगतीचा आढावा घेतील. तसंच विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष, संरक्षण आणि सुरक्षा, कृषी, जल व्यवस्थापन, व्यापार आणि अर्थव्यवस्था, दोन्ही देशांमधील लोकांचे परस्पर संबंध यासह इतर विविध क्षेत्रात दोन्ही देशांदरम्यान सहकार्याच्या संधींबाबत चर्चा करतील. दोन्ही नेत्यांमध्ये होणाऱ्या चर्चेत परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर आपल्या दृष्टीकोनांचेही आदानप्रदान होण्याची शक्यता आहे. पंतप्रधान आज इस्रायलच्या संसदेला म्हणजेच नेसेटला संबोधित करणार असल्याचं भारताचे इस्रायलमधील राजदूत जे.पी. सिंग यांनी आकाशवाणीच्या वार्ताहराला सांगितलं. इस्रायलच्या संसदेला संबोधित करणारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान असल्याचंही सिंग यांनी नमूद केलं. उद्या पंतप्रधान इस्रायलचे अध्यक्ष इसाक हरझॉग यांची भेट घेणार आहेत.

**<u>दहशतवादसामना</u>**

दहशतवाद आणि दहशतवादी संघटनांसह त्यांचे हस्तक, समर्थक तसंच त्यांना आश्रय देणारे पाठीराखे यांचा सामना करण्यासाठी सहकार्यास कटिबद्ध असल्याचा भारत आणि इस्रायलनं पुनरुच्चार केला आहे. दहशतवादाच्या विरोधातील भारत-इस्रायल संयुक्त कार्यगटाची १० वी बैठक काल नवी दिल्लीत पार पडली, त्यामध्ये दोन्ही देशांनी कुठल्याही स्वरुपातील दहशतवादाचा अत्यंत स्पष्ट आणि कडक शब्दात निषेध केला. तसंच दहशतवादाच्याविरोधात सातत्यपूर्ण, व्यापक आणि विशेष भर देऊन कृती करण्याच्या गरजेवरही या बैठकीत जोर देण्यात आला. दोन्ही देशांनी द्विपक्षीय आणि बहुपक्षीय चौकटींतर्गत प्रशिक्षण, सायबर सुरक्षा, सर्वोत्तम पद्धतींचं आदानप्रदान आणि माहितीची देवाणघेवाण याद्वारे सहकार्य वाढविण्याच्या मार्गांवर चर्चा केली. तसंच कायद्यांची अंमलबजावणी आणि न्यायिक सहकार्य मजबूत करण्यावर देखील या बैठकीत चर्चा करण्यात आली.

**<u>मंत्रिमंडळनिर्णय</u>**

नवी दिल्लीत नव्यानं उभारलेल्या सेवा तीर्थ संकुलात काल प्रथमच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. २०४७ पर्यंत भारताला समृद्ध, सक्षम, आणि आत्मनिर्भर राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीनं या वास्तूत घेतला जाणारा प्रत्येक निर्णय देशातल्या १४० कोटी जनतेच्या आशा आकांक्षांचं प्रतीक असेल, असा ठराव आजच्या बैठकीत एकमतानं मंजूर करण्यात आला. तसंच केरळ राज्याचं नाव केरलम् असं करण्याच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळानं मान्यता दिल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीतील निर्णयांची माहिती देताना सांगितलं.

महाराष्ट्रासह ४ राज्यांमधल्या ८ जिल्ह्यांना जोडणाऱ्या ३ रेल्वे प्रकल्पांना कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. गोंदिया-जबलपूर रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाचा त्यात समावेश आहे. या प्रकल्पांवर ९ हजार ७२ कोटी रुपये खर्च होणार आहे. श्रीनगर विमानतळाजवळ ७३ एकर भूखंडावर १ हजार ६७७ कोटी

रुपये खर्चाचं सिविल एनक्लेव संकुल उभारायला, तसंच गुजरातमधे अहमदाबाद मेट्रोच्या विस्तारालाही काल मंजुरी देण्यात आली.

**संयुक्तराष्ट्रठराव**

संयुक्त राष्ट्र महासभेत काल रशिया आणि युक्रेन यांच्यातील तात्काळ,पूर्ण आणि बिनशर्त युद्धविरामाचं आवाहन करणाऱ्या मसुदा प्रस्तावावर झालेल्या मतदानावेळी भारत तटस्थ राहिला. 193 सदस्य असलेल्या संयुक्त राष्ट्र महासभेत या प्रस्तावाला 107 देशांच्या पाठिंब्यासह मंजुरी देण्यात आली.12 देशांनी या ठरावाच्या विरोधात मतदान केलं आणि 51 देश तटस्थ राहिले. या 51 देशांमध्ये भारतासह बहारीन, बांगलादेश, ब्राझील, चीन, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, संयुक्त अरब अमीरात इत्यादी देशांचा समावेश होता. या ठरावात आंतरराष्ट्रीय कायद्याच्या, विशेषतः संयुक्त राष्ट्रांच्या जाहिरनाम्याच्या अनुषंगानं, व्यापक, न्याय्य आणि शांततेच्या आवाहनाचा पुनरुच्चार करण्यात आला.

**शिवराजसिंह चौहान**

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राज्यांना देण्यात आलेल्या निधीचा येत्या ३१ मार्चच्या आत शंभर टक्के वापर करण्याची गरज केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी स्पष्ट केली आहे. चौहान यांनी काल दिल्लीत महाराष्ट्रासह आसाम, बिहार, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान आणि हरयाणा या राज्यांचे कृषी मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत दूरस्थ पद्धतीनं झालेल्या बैठकीत राष्ट्रीय कृषी विकास योजनेचा तसंच कृषी उन्नती योजनेचा आढावा घेतला. विविध योजनांचे लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी केंद्रीय निधीचा वेळच्यावेळी आणि कार्यक्षम वापर होण्याची गरज त्यांनी या बैठकीत व्यक्त केली.

**विधीमंडळकामकाज**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. यात कृषी आणि उद्योग क्षेत्राशी संबंधित मागण्यांचा समावेश आहे.

अमली पदार्थांबाबत शून्य सहिष्णुता हे सरकारचं धोरण असल्याचं मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितलं. कुरिअरद्वारे अमली पदार्थ पाठवले जात असल्यास अशा कुरिअरवर कारवाई केली जाईल असं सांगून अमली पदार्थ विक्रीत दोषी ठरलेल्या पोलिसांना बडतर्फ केलं जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

आयुष्यमान भारत आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना राबवणं यापुढे सर्व पात्र रुग्णालयांना बंधनकारक असेल, टाळाटाळ करणाऱ्या रुग्णालयांवर कडक कारवाई केली जाईल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**नक्षलवादी**

तेलंगणा राज्यात हैदराबाद इथं काल चार वरिष्ठ नक्षलवादी नेत्यांनी आत्मसमर्पण केलं. पोलिटब्युरो सदस्य तिप्पिरी तिरुपती देवुजी, केंद्रीय समितीचे सदस्य मल्ला राजी रेड्डी संग्राम, तेलंगणा राज्य समितीचे

सचिव बडे चोक्का राव दामोदर  आणि राज्य समितीचे  सदस्य नुने नरसिंहा रेड्डी गंगन्ना यांनी पोलीस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांच्या समक्ष आत्मसमर्पण केलं. प्रत्येक नेत्याला २५ लाख रुपयांचा धनादेश दिला असून त्यांना सुरक्षा आणि पुनर्वसनाची हमी दिली आहे. या आत्मसमर्पणामुळे माओवादी पक्षाची तेलंगणा राज्य समिती पूर्णपणे निष्क्रिय झाली आहे. राज्यातील ५९१ माओवादी कार्यकर्त्यांपैकी फक्त ११ जण शिल्लक असून बाकी सर्वांनी आत्मसमर्पण केलं आहे, असं रेड्डी यांनी सांगितलं.

**<u>क्रिकेटटी</u>**

मर्यादित 20 षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, सुपर एट गटात काल इंग्लंडनं पाकिस्तानचा 2 गडी राखून पराभव केला. श्रीलंकेतल्या  पल्लिकल इथं झालेल्या या सामन्यात सुरुवातीला फलंदाजी करताना पाकिस्तानच्या निर्धारित 20 षटकात 9 गडी बाद 164 धावा झाल्या होत्या. हे लक्ष इंग्लंडनं 8 गडी बाद 165 धावांमध्ये पूर्ण केलं. कर्णधार हॅरी ब्रूकनं 51 चेंडूत 100 धावा केल्या तर जबकि लियाम डॉसन नं 3 बळी घेतले.

महिला क्रिकेटमधे भारत-ऑस्ट्रेलिया संघांमधल्या, मर्यादित ५० षटकांच्या मालिकेत काल ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताचा डाव ४९ व्या षटकात २१४ धावांवर संपला. ऑस्ट्रेलियानं ही धावसंख्या ४ गडी गमावून ३९ व्या षटकातच पार केली.

**या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.**